Postal Lic./AMT/RNP/492/2023-2025

वरुड | शुक्रवार
०१.०८.२०२५

# वरुड दर्पण

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०६ | अंक: १५५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

## थोडक्यात

### माजी पंतप्रधानांचा नातू, माजी मुख्यमंत्र्यांचा लेक, बलात्कार प्रकरणात ठरला दोषी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***नवी दिल्ली*** – जनता दल सेक्युलरचे नेते आणि कर्नाटकातील हासन मतदारसंघाचे माजी खासदार प्रज्वल रेवण्णा यांना न्यायालयाने दणका दिला आहे. महिलांचे लैंगिक शोषण आणि बलात्कार प्रकरणात रेवण्णा यांना दोषी ठरवण्यात आले आहे. कोर्टाने त्यांना दोषी ठरवल्याचे कळताच रेवण्णा कोर्टामध्ये ढसा ढसा रडायला लागले. कोर्टातून बाहेर पडते वेळी रेवण्णा रडताना दिसले होते. कोर्टात उपस्थित लोकांनी सांगितले की कोर्टाचा हा निर्णय त्यांच्यासाठी अनपेक्षित होता. रेवण्णा यांना दोषी ठरविण्यात आले असून आता त्यांना शिक्षा काय होते याकडे लक्ष लागले आहे.

# पुण्याच्या यवतमध्ये २ गट भिडले, जोरदार दगडफेक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**पुणे** – पुण्याच्या दौंडमधील यवतमध्ये चार दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची विटंबना केल्याच्या कारणावरुन तणाव निर्माण झाला होता. यावरुन यवतसह दौंड तालुक्यात बंदचे आवाहन करण्यात आले होते. यादरम्यान काल भाजपचे नेते गोपीचंद पडळकर, संग्राम जगताप तसेच किन्नर आखाड्याच्या प्रमुख जगद्गुरु स्वामी हेमांगी सखीजी या तिघांनी या ठिकाणी येऊन भाषणे केली.

त्यांची पाठ फिरताच यवत मध्ये आज सकाळी दंगल उसळली. यवतमध्ये काल गोपीचंद पडळकर व आमदार संग्राम जगताप यांच्यासह इतरांची भाषणे झाली. त्यानंतर 'फेसबुकवर' एक पोस्ट टाकल्याच्या कारणावरुन पुन्हा तणव निर्माण झाला आणि त्यानंतर आज थेट सकाळी

## आक्षेपार्ह पोस्टवरुन तणाव, पोलिसांचा लाठीमार



बाजारपेठ बंद करुन काही घरे, बेकरी व धर्मस्थळावर जमावाने हल्ला केला. यात काही दुकाने व घरांना आगी लावण्यात आल्या. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि दंगल नियंत्रण पथक या ठिकाणी पोचले. त्यांनी अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडल्या आणि जमावाला पांगवण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर यवतमध्ये तणावपूर्ण शांतता आहे. प्रतिमेची विटंबना झाल्याच्या प्रकरणात पोलिसांनी आरोपीलादेखील ताब्यात घेतले व तातडीने अटक केली मात्र त्यानंतरही परिसरातील वातावरण तणावाचे होते. त्यातच फेसबुक वरील आक्षेपारह पोस्टची भर पडल्याने वातावरण हिंसक बनले. पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले असून पोलिसांनी या ठिकाणी जमावबंदीचा आदेश लागू केला आहे. आज यवतमध्ये आठवडे बाजार भरतो. पण तणावपूर्ण परिस्थिती पाहता बाजार भरलेला नाही. स्थानिकांनी संयम बाळगावा आणि शांतता ठेवावी, असं आवाहन दौंडचे आमदार राहुल कुल यांनी केलं. पोलिसांकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्याविरोधात कारवाई करण्यावरुन एकमत झालं होतं. पण दरम्यान एकानं आक्षेपार्ह पोस्ट केली आणि उद्रेक झाला. त्यामुळे परिस्थिती बिघडली, असा घटनाक्रम कुल यांनी कथन केला. सगळ्या लोकांना विश्वासात घेऊन प्रशासनाच्या मदतीनं शांतता प्रस्थापित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्या प्रयत्नांना यशदेखील येत असल्याचं आमदार कुल म्हणाले आहे.

**महादेव मुंडे यांच्या पत्नी मुख्यमंत्र्याना भेटल्या व लगेच आरोपींची धरपकड**

# याचाच अर्थ राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि पोलिसांवर दबाव : जितेंद्र आव्हाड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***नागपूर*** – महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणात न्याय मिळत नसल्याने व्यथित झालेल्या ज्ञानेश्वरी मुंडे यांनी विष प्राशन करुन आत्महत्येचा प्रयत्न केला होता. या घटनेनंतर महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाचा तपास नव्याने स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेने आजपर्यंत संशयित दहा ते बारा जणांची चौकशी केली. चौकशीत एका महिलेचा देखील समावेश आहे. तर मकोकाच्या गुन्ह्यात फरार असलेल्या गोट्या गित्तेच्या अटकेसाठी यापूर्वीच तीन पथक रवाना करण्यात आले आहे. दरम्यान याच



मुद्द्यवरुन आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी टीका करत कारवाई संदर्भात संशय व्यक्त केला आहे.

ज्ञानेश्वरी मुंडे यांनी काल मुख्यामंत्र्याची भेट घेतली आणि आज लगेच ४ संशयित आरोपींची धरपकड करण्यात येतेय, याचाच अर्थ हि कारवाई आतापर्यंत राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि पोलिसांवर दबावामुळे होत नव्हती का? असा सवाल त्यांनी विचारला आहे.

ज्ञानेश्वरी मुंडे काल मुख्यामंत्र्याना भेटल्या, आज लगेच आरोपींची धरपकड परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांचा २० महिन्यांपूर्वी निर्घुणपणे खून करण्यात आला. या घटनेत आत्तापर्यंत एकाही आरोपीला अटक नाही. त्यामुळे मुंडे कुटुंब आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहे.

# आयअॅमवेरीहॅप्पी...रमीमुळे कृषीमंत्रिपद जाताच कोकाटेंची पहिली प्रतिक्रिया

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – विधिमंडळात रमी खेळणारे माणिकराव कोकाटे यांची अखेर कृषी मंत्रिपदावरुन उचलबांगडी झाली. माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषिखात्याचा कारभार काढून घेण्यात आलं आहे. माणिकराव कोकाटेंकडे आता दत्तात्रय भरणे यांच्याकडे असलेला क्रीडा आणि युवक कल्याण खात्याचा पदभार देण्यात आलाय. तर दत्तात्रय भरणे आता नवे कृषीमंत्री असणार आहेत. दरम्यान, कृषि मंत्रीपदावरुन उचलबांगडी झाल्यानंतर माणिकराव कोकाटे यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे.

माणिकराव कोकाटे यांनी कृषीमंत्रिपदावरुन हटवून क्रीडा आणि युवक कल्याण खात्याचा पदभार दिल्यानंतर




आज पहिल्यांदाच माध्यमांशी संवाद साधला. यावेळी जो निर्णय घेतला आहे, तो मला मान्य आहे, असं माणिकराव कोकाटे म्हणाले.

तसेच दत्तात्रय भरणेंना काही मदत लागली मी नक्की करेन आणि त्यांची मला मदत लागल्यास मी घेईन, अशी प्रतिक्रिया माणिकराव कोकाटेंनी दिली. तसेच नवीन खातं आवडलं का?, असं विचारताच असं माणिकराव कोकाटे म्हणाले. अजितदादांनी एका दगडात मारले दोन पक्षी खातेपालटावर विरोधी पक्ष टीका करत असले तरी अजित पवारांनी एका दगडात दोन पक्षी मारलेत. क्रीडा आणि युवक खातं मिळाल्याने अजितदादांचे विश्वासू असलेलेल दत्तात्रय भरणे हे नाराज असल्याची चर्चा होती. दत्तात्रय भरणेंनी खातेवाटपानंतर ही नाराजी उघडही केली होती.

मात्र आता कोकाटेंवरील कारवाई ही दत्तात्रय भरणेंसाठी एक लॉटरी ठरलीय. कृषिखात्यासारख्या महत्त्वाच्या खात्यावरील वर्णी ही भरणेंसाठी लॉटरीच मानली जातेय. एकीकडे कोकाटेंचा खातेपालट करत अजित पवारांनी कारवाई केल्याचं दाखवलंय. तर दुसरीकडे विश्वासू दत्तामामा भरणेंना कृषिखातं देत अजित पवारांनी एका दगडात दोन पक्षा मारल्याची चर्चा रंगली आहे.

कोकाटेंचं खाते बदलताच सुप्रिया सुळेंचा हल्लाबोल– माणिकराव कोकाटे यांचं खाते बदलताच राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी हल्लाबोल केला आहे. राज्यातील कृषी क्षेत्र पुर्णपणे कोलमडून पडलेले असताना विधिमंडळात बसून रमी खेळणारे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर किती संवेदनशील असतील? याहून कहर म्हणजे या कृषीमंत्र्यांचे केवळ खाते बदलून अभय देणारे सत्ताधारी किती गंभीर असतील? याची शंका आल्याशिवाय राहत नाही.

आपले पद आणि जबाबदारी यांची किंचितही जाणीव नसणारी व्यक्ती मंत्रीमंडळात आहे याची खरंतर राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना खंत वाटली पाहिजे, अशी टीका सुप्रिया सुळेंनी केली.

# महादेवी हत्तीनीला इस्माईल चाचानी पोटच्या लेकरासारखं वाढवलं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***कोल्हापूर*** – कोल्हापूर मधील नांदणी गावातील महादेवी उर्फ माधुरी हत्तीणीला निरोप देताना प्रचंड जनसागर उसळला होता. कोल्हापूरच्या शिरोळ तालुक्यात असलेल्या नांदणी गावामध्ये ही महादेवी हत्तीण राहत होती. गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून ही माधुरी नावाने ओळखली जाणारी हत्तीण जैन समाजाच्या मंदिरामध्ये आनंदाने राहत होती. अगदी लहान असल्यापासून तीच मंदिरामध्ये वास्तव्य होतं, महादेवी उर्फ माधुरी हिला मंदिरातील पुजाऱ्यांनी, भाविकांनी आणि गावकऱ्यांनी जीव लावला होता. अगदी लहानांपासून मोठ्यापर्यंत

## निरोप देताना गळ्यातल्या टॉवेलने तिच्या डोळ्यातले अश्रू पुसले



माधुरी सर्वांचीच लाडकी होती. ती फक्त एक प्राणी म्हणून नाही तर मंदिराच्या आवारातील एक महत्त्वाचा घटक म्हणून तिच्यावपती सर्वजण प्रेम, माया करत होते. मात्र कायद्याच्या चौकटीमध्ये भावनांनी अखेर हार मानली. मनावर दगड ठेवून सर्वांनीच लाडक्या माधुरीची पाठवणी केली.

तिला डोळे भरुन पाहण्यासाठी हजारोंचा जनसागर उसळला पाठवणी करण्याआधी तिला डोळे भरून पाहण्यासाठी हजारोंचा जनसागर उसळला होता. तिची मिरवणूक काढण्यात आली, केक देखील कापला, तिला ओवाळलं, तिला भरभरून आशीर्वाद दिले, यावेळी तिला हात लावत सर्वांनी तिच्यावर असलेलं प्रेम व्यक्त केलं. काहींना तिला पाहताच अश्रू अनावर झाले, सर्वांनी तिला नेऊ नये अशी इच्छा व्यक्त केली. मात्र, कायद्यापुढं सर्वांच्या भावनांना देखील हार मानावी लागली, कोर्टाच्या निकालानंतर कोल्हापूरच्या महादेवी हत्तीणीची रवानगी गुजरातच्या वनतारामध्ये करण्यात आली आहे. तिच्या पाठवणीआधी तिची मिरवणूक काढली यावेळी तिचा माहुत इस्माईल चाचा यांनी तिला एकटीला कुठेही सोडलं नाही.

मिरवणुकीवेळी ज्याप्रमाणे सर्वांना अश्रू अनावर झाले त्याचप्रमाणे माधुरी देखील तिच्या भावना डोळ्यातून व्यक्त करताना दिसली. तिचे डोळे देखील पाणावले होते, यावेळी माहुत इस्माईल चाचानी तिचे गळ्यातल्या टॉवेलने डोळे पुसले.

माऊली टाईपरायटींग अॅन्ड कॉम्प्युटर इन्स्टीट्युट
Admission Open
Maharashtra Government Authorised Institute
COMPUTER TYPING COURSE
GCC - TBC - SSD
English 30/40/50 -wpm | Marathi 30/40-wpm | Hindi 30/40-wpm
MKCL
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कॉम्प्युटर कोर्स
जिजाऊ नगर, जुन्या शांतीनिकेतन कॉन्व्हेंट जवळ, वरुड

# ‘हिंदू टेरर’ षडयंत्राचा पर्दाफाश, मुख्यमंत्री फडणवीसांची काँग्रेसवर टीका

## भगवा दहशतवाद शब्द चुकिचाच, मात्र भगवा, हिंदुत्व आणि सनातन एक नाही, पृथ्वीराज चव्हाण यांचं प्रत्युत्तर

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**



***मालेगाव*** – मालेगावमधील बॉम्बस्फोट प्रकरणाच्या कालच्या निकालानंतर, काँग्रेस पक्षाने तयार केलेलं ‘हिंदू टेरर’ आणि ‘भगवा आतंकवाद’ अशा प्रकारचं नरेटिव्ह आता पूर्णपणे बस्ट झालं आहे. वोट बँकेच्या राजकारणासाठी हे शब्द तयार केले होते. इस्लामिक दहशतवादाच्या चर्चेच्या काळात हिंदूंना आतंकवादी ठरवण्याचं हे षडयंत्र होतं. हिंदुत्ववादी संघटना आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांना लक्ष्य करण्याचा प्रयत्न होता. मात्र, पोलिसांवर दबाव आणूनही त्यांच्याविरोधात कोणतेही ठोस पुरावे मिळाले नाहीत. आता हे षडयंत्र हळूहळू बाहेर येत आहे. ‘भगवा’, ‘हिंदू’ किंवा ‘सनातनी’ यात कोणताही भेद नाही, हे सर्व राष्ट्रप्रेमी आणि राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित आहेत. असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी काँग्रेसवर टीका केली आहे.

भगवा दहशतवाद हा शब्द चुकिचाच, मात्र तर दुसरीकडे मुख्यमंत्र्यांच्या या टीकेला माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे जेष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रत्युत्तर देत या विषयावर भाष्य केलं आहे. भगवा दहशतवाद हा शब्द वापरला, हा चुकिचाच होता. आजही तो वापरला जाऊ नये, अशी माझी भुमिका आहे. मी माझ्या सहकाऱ्यांना तसं सांगीतल देखील आहे. मात्र भगवा, हिंदुत्व आणि सनातन हे एक नाही. असेही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. मी मुख्यमंत्री असताना सनातन वरती बंदी आणण्याचा प्रस्ताव पाठवला होता.

# आदिवासीबहुल ८ जिल्ह्यांमध्ये सुधारित आरक्षण

## एसईबीसी प्रवर्गाला १० टक्के जागा, बिंदूनामावलीही निश्चित

**(वार्ताहर वरुड दर्पण)**



***मुंबई*** – सरकारने आदिवासीबहुल आठ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय गट–क आणि गट–ड संवर्गातील पदांसाठी सुधारित आरक्षण आणि बिंदूनामावली निश्चित केली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने जारी करण्यात आला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आरक्षण उपसमितीने याबाबत केलेल्या शिफारशीनंतर ही बिंदूनामावली निश्चित करण्यात आली आहे.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाच्या आरक्षणासह नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली या आठ आदिवासी बहुल जिल्ह्यांसाठी सुधारित आरक्षण विहित करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना सुचवण्यासाठी महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यात आली होती. या उपसमितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन शासनाने हा निर्णय घेतला आहे. आठ जिल्ह्यांमध्ये बिंदू नामावली लागू या आठ आदिवासीबहुल जिल्ह्यांमध्ये ही आरक्षण बिंदूनामावली लागू करण्यात येणार आहे. या जिल्ह्यांमधील इतर मागास वर्ग, तसेच विमुक्त जाती/भटक्या जमाती या प्रवर्गाची प्रचलित आरक्षणाची टक्केवारी आणि लोकसंख्या विचारात घेऊन गट–क आणि गट–ड संवर्गातील सरळसेवा भरतीसाठी सुधारित आरक्षण निश्चित करण्यात आले होते. त्यानंतर या सुधारित आरक्षणा नुसार बिंदूनामावली देखील विहित करण्यात आली होती. राज्यातील सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग प्रवर्गास शासकीय सेवेतील सरळसेवा पदभरतीस तसेच शैक्षणिक संस्थांतील प्रवेशास १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

# अजित पवारांनी मला कृषिमंत्रिपदाची ऑफर दिली होती

## राज्यभरात कृषिमंत्रिपद चर्चेत असतानाच छगन भुजबळांचा मोठा दावा

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**



***मुंबई*** – राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी विधिमंडळात माणिकराव कोकाटे रमी खेळत असल्याचा व्हिडीओ उघड केला होता.

यानंतर विरोधकांनी कोकाटे यांच्या कृषीमंत्रिपदाचा राजीनामा मागितला होता. आता माणिकराव कोकाटे यांची कृषि मंत्रीपदावरुन उचलबांगडी करण्यात आली असून त्यांच्याकडे क्रीडा आणि युवक कल्याण विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर दत्तात्रय भरणे यांना राज्याचे नवे कृषिमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत. एकीकडे माणिकराव कोकाटे यांच्यामुळे कृषी खाते राज्यभरात चर्चेत आलेले असतानाच आता राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मोठा दावा केलाय. अजित पवारांनी मला कृषिमंत्रीपदाची ऑफर दिली होती. भाजपसोबत सत्तेत आलो त्यावेळी कृषिमंत्रिपद घेण्यासाठी आग्रह करण्यात आला. अजित पवार माझ्यासाठी आग्रही होते, असे भुजबळ यांनी म्हटले आहे. छगन भुजबळ यांनी नाशिक येथे माध्यमांशी संवाद साधताना हा दावा केलाय. छगन भुजबळ म्हणाले की, ज्यावेळी आम्ही पहिल्यांदा भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत सरकारमध्ये आलो, त्यावेळेला अजितदादांनी अर्थ खाते घेतलं. त्यानंतर बाकीचे खाते माझ्यासमोर ठेवले. तुम्हाला जे खाते पाहिजे आहे ते घ्या. त्यावेळी आम्ही चर्चा केली. तेव्हा अजित पवारांनी माझ्याकडे खूप आग्रह केला होता की, कृषी खातं चांगलं आहे, हे तुम्ही घ्या. असा दावा त्यांनी केला आहे. भरणे मामा पदाला न्याय देतील छगन भुजबळ पुढे म्हणाले की, मला कृषी खाते घेण्यासाठी आग्रह केला. पण ग्रामीण भागातील लोकांना द्या, हे मी सांगितले. कारण माझे राजकारण मुंबईत झाले आहे. आम्ही शेतकरी प्रश्नावर मागे उभे राहते.

पण, त्याची बारीकसारीक माहिती देणारे माणसे ग्रामीण भागात असतात. त्यामुळे आता भरणे मामा या पदाला न्याय देतील. बालपणापासून जो ग्रामीण भागात राहिलेला आहे, तो जास्त न्याय देऊ शकतो. भरणे मामा यांनी काही अडचण येईल, असं वाटत नाही. प्रत्येक खातं महत्त्वाचं असतं. प्रत्येक खातं हे चांगलं आहे. आपण कसे काम करतो यावर ते अवलंबून असते, असे देखील त्यांनी म्हटले आहे.

# कदमांनी सावली बारमधील ऑर्केस्ट्रा परवाना परत करताच अनिल परब यांचा हल्लाबोल

**(वार्ताहर वरुड दर्पण)**



***मुंबई*** – राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांची अडचण वाढली असताना ऑर्केस्ट्रा परवाना परत करुन फक्त रेस्टोबार आणि हॉटेल परवाना ठेवला असल्याची माहिती मिळाली आहे.

कदम यांनी सावली बार ज्या व्यक्तीस चालवण्यास दिला त्यासोबतचा करारनामा अगोदरच रद्द केला आहे. यानंतर आता गृहराज्यमंत्री योगेश कदमांच्या आईच्या नावाने असणाऱ्या सावली बारमधील ऑर्केस्ट्रा परवाना परत केल्याची माहिती समोर आली आहे. सदर प्रकरणी आता ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी हल्लाबोल केला आहे. चोरीचा माल परत केला म्हणजे गुन्ह्यातून सुटता येत नाही. परवाना परत केला म्हणजे डान्स बारमध्ये अवैध्य काम सुरु होतं हे मान्य केलं, असं अनिल परब म्हणाले.

तसेच आधी सांगत होते केवळ ऑर्केस्ट्रा चालतो. या परवान्यावर डान्स बार चालवला गेला. अजून तपास सुरु आहे, गुन्हा घडला आहे, असं अनिल परब यांनी सांगितले. याआधी देखील सावली बारवर कारवाई झाली आहे.


### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८२९/२०२५** **ने.ता.११/०९/२०२५**

**अर्जदार :-** १) मधुकर बारकाजी कुरवाळे, वय अं.७० वर्ष, धंदा-मजुरी, २) श्रीमती यशोदा बारकाजी कुरवाळे, वय अं.९० वर्ष, धंदा-आराम, दोन्ही रा.बेनोडा (शहीद), ता.वरुड, ३) सौ.बेबी बाबुराव कैलाखे, वय अं.६५ वर्ष, धंदा-घरकाम, रा.खैरगांव, ता.नरखेड, ४) सौ.मंजुळा लक्ष्मण ढोमणे, वय अं.६३ वर्ष, धंदा-घरकाम, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत बारकाजी झिंगुजी कुरवाडे (कुरवाळे), रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०९/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **३०/०७/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८०६/२०२५** **ने.ता.०८/०९/२०२५**

**अर्जदार :-**

कु.भावना लिलाधरराव खेरडे
वय अं.१० वर्ष, धंदा-शिक्षण
(अर्जदारातर्फे अ.पा.क मामा-आईचे भाऊ)
रा.व्दारा किशोर मोतीरामजी खसारे, वय अं.६४ वर्ष
धंदा-शेती, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत लिलाधर नत्थुजी खेरडे व मयत पद्मा लिलाधर खेरडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०८/०९/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **३०/०७/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**जे.एस.ठाकरे मॅडम, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८०९/२०२५** **ने.ता.०८/०९/२०२५**

**अर्जदार :-** १) विश्वनाथ महादेवराव दंडाळे, वय अं.७० वर्ष, धंदा-शेती, २) श्रीमती पंचफुला मारोतराव दंडाळे, वय अं.६७ वर्ष, धंदा-घरकाम, ३) ओंकार मारोतराव दंडाळे, वय अं.४५ वर्ष, धंदा-शेती, ४) विनोद मारोतराव दंडाळे, वय अं.४० वर्ष, धंदा-शेती, ५) सौ.छबी ओंकार मसुले, वय अं.४९ वर्ष, धंदा-घरकाम, रा.जरुड, ६) सौ.बेबी सुधाकर ब्राम्हणे, वय अं.४८ वर्ष, धंदा-घरकाम, रा.मांगरुळी, ७) श्रीमती कमलाबाई किसनराव दंडाळे, वय अं.६५ वर्ष, रा.घरकाम, ८) मनोज किसनराव दंडाळे, वय अं.४९ वर्ष, धंदा-शेती, ९) अरुणा प्रमोद बासंदे, वय अं.४७ वर्ष, धंदा-घरकाम रा.वंडली, १०) अर्चना सुभाषराव घोरपडे, वय अं.४४ वर्ष, धंदा-घरकाम, रा.दिल्ली, क्र.१ ते ४ व ७ आणि ८ रा.खडका

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांना **मयत सोनाबाई महादेवराव दंडाळे, रा.खडका, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०८/०९/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२८/०७/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील**
**व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८२३/२०२५** **ने.ता.१०/०९/२०२५**

**अर्जदार :-** १) श्रीमती मालती वसंतराव अलोने, वय अं.८० वर्ष, धंदा-घरकाम, रा.जरुड, २) रंजना गजानन गायधने, वय अं.४२ वर्ष, धंदा-घरकाम, रा.वार्ड क्र.५ खैरगांव, ता.नरखेड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत वसंतराव शामराव अलोने, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१०/०९/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२९/०७/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# संपादकीय

## गुणांचं कौतुक उशीरा होतं; पण होतं

**सुविचार** “आपल्या समाजातील समस्यांची समज घेणे ही विश्वात्मक दृष्टिकोन वाचणे आणि चर्चा करणे महत्त्वाचे आहे”

# संव्यग समानता

केरळने समान नागरी कायद्याला विरोध केला, तर चालत नाही, पण मग नागालँड, मिझोराम या रालोआतील राज्यांचा विरोध कसा चालतो? कोणत्याही कायद्याची परिणामकारकता तो बनवताना सर्व पळवाटा किती प्रमाणात बुजवल्या जातात यावर असते. जितक्या कमी वा शून्य पळवाटा; तितका तो कायदा उत्तम असतो आणि अशा कायद्याची अंमलबजावणीही उत्कृष्ट होऊ शकते. याच्या जोडीला अशा चांगल्या कायद्याच्या परिणामकारकतेबाबत एक खबरदारी बाळगावी लागते. ती म्हणजे कायद्याच्या अंमलबजावणीतून कोणाचाही अपवाद असणार नाही. कायद्याच्या अंमलबजावणीतून कोणाचाही अपवाद केला जाणार नाही; ही अत्यंत आदर्श अवस्था. ती नसेल तर काय होते आणि कायद्याची परिणामकारकता कशी विकलांग होते याचे उत्तम उदाहरण म्हणजे वस्तू-सेवा कायदा. ‘जीएसटी’च्या अंमलबजावणीत पहिल्या दिवसापासून अनेक अपवाद दिले गेले. म्हणजे वस्तू-सेवा कायद्याचा अंमल सुरू होऊन इतका काळ लोटला तरी अद्याप पेट्रोल-डिझेल आणि मद्य यांचा अंतर्भाव या कायद्यात करण्यात आलेला नाही. इंधनासारखा पायाभूत घटक जेव्हा या कायद्याच्या कक्षेपासून दूर ठेवला जातो तेव्हा त्याचा परिणाम प्रत्येक घटकावर होतो. ही नुकसानभरपाई कशी करायची याचे उत्तर केंद्राकडे नाही. ते कसे शोधायचे याचा विचार कायदा जन्मास घालण्यापूर्वी करायचा असतो. तो केलेला नाही. परिणामी वस्तू-सेवा कायदा जन्माला येतानाच महत्त्वाचे अपंगत्व घेऊन आला. नेमका हाच धोका आता ज्याचा गवगवा करणे सरकारला आवडते त्या ‘समान नागरी कायद्या’बाबत संभावतो. त्याची दखल घेणे आणि त्यावर आताच विचार करणे अगत्याचे. रावसाहेब दानवेंनी रात्री खिशातून काढलेल्या ‘त्या’ चिट्ठीने चर्चांना उधाण, मनोज जरांगे संतापले नाना पाटेकरांचं खरं नाव माहितीये का? रायगडमध्ये जन्मलेल्या नानांची कौटुंबीक व शैक्षणिक पार्श्वभूमी वाचून थक्क याचे कारण आणखी एका राज्याने समान नागरी कायद्यातून स्वत:स वेगळे ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. ही घटना अत्यंत दखलपात्र ठरते याचे कारण या राज्यातील सत्ताधारुयांत भाजपचाच समावेश आहे. म्हणजे केंद्रात सत्ताधारी भाजप ‘समान नागरी कायद्या’चे गोडवे गाणार, त्याची अपरिहार्यता मिळेल तेव्हा अधोरेखित करणार, या पक्षाचे समाजमाध्यमी भाट या कायद्यातील त्रुटी दाखवणाऱ्यास राष्ट्रद्रोही इत्यादी ठरवणार आणि त्याच वेळी त्याच पक्षाचे सरकार आम्हास हा कायदा नको, असे म्हणणार, असा हा दुटप्पी खेळ. या कायद्यास विरोध करणारे नवे राज्य आहे ते नागालँड. त्या राज्याचे मुख्यमंत्री नेईफेऊ रिओ यांनी याबाबत राज्याच्या निर्धाराची घोषणा केली. त्या राज्याच्या विधानसभेतच याबाबतचा ठराव मंजूर केला गेला आणि त्या ठरावास सर्वच पक्षांनी पाठिंबा दिला. या ‘सर्व’ पक्षात केंद्रातील सत्ताधारी भाजपदेखील आहे आणि रिओ यांची ‘नॅशनॅलिस्ट डेमॉक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पार्टी’ ही केंद्रातील ‘राष्ट्रीय लोकशाही आघाडी’ची सदस्य आहे. “समान नागरी कायदा विवाह प्रथा, घटस्फोट, विवाहितांच्या अपत्यांचे संगोपन इत्यादी मुद्दय़ांवर समान, एकच एक नियम करु इच्छिते. तसे झाल्यास नागा संस्कृतीच्या प्रथा, परंपरांस तडा जाण्याचा धोका आहे”, असे स्पष्ट शब्दांत नमूद करुन नागालँड विधानसभा या संभाव्य कायद्यातून आमच्या राज्यास वगळण्याचा ठराव एकमताने मंजूर करते. हे राज्य असे एकमेव असते तर त्याकडे एकवेळ दुर्लक्ष करता आले असते. वास्तव तसे नाही. नागालँडप्रमाणे मिझोराम या त्याच प्रदेशातील आणखी एका राज्याने या कायद्यापासून आम्हास दूर ठेवा अशी मागणी केलेली आहे. ‘मिझो नॅशनल फ्रंट’ हा या राज्यातील सत्ताधारी पक्ष. ‘समान नागरी कायदा आम्हास नको’ या त्या राज्यातील सत्ताधारी पक्षाच्या भूमिकेसही सर्वपक्षीय पाठिंबा आहे आणि महत्त्वाचा मुद्दा असा की ‘मिझो नॅशनल फ्रंट’ हा पक्ष केंद्रातील सत्ताधारी ‘रालोआ’ आघाडीचा सदस्य आहे. यातून समोर येणारा मुद्दा दुर्लक्षित राहणे अशक्यच. कारण जो कायदा हवा म्हणून केंद्रातील सत्ताधारी पक्ष इतके आकाशपाताळ एक करतो, तोच कायदा नको असे त्याच सत्ताधारी आघाडीचे घटक पक्ष म्हणतात. देखील एक नव्हे तर दोन राज्यांत. विचारसरणीच्या दृष्टीने अगदी विरुद्ध दिशेला असणाऱ्या केरळसारख्या राज्यानेही हीच भूमिका घेतलेली आहे. केंद्रीय सत्ताधारी आघाडीने या भूमिकेसाठी केरळ राज्यावर टीकेची राळ उठवली. पण नागालँड, मिझोराम राज्याबाबत मात्र केंद्रीय सत्ताधारी पक्षाने मौन पाळलेले दिसते. केरळात साम्यवादी सत्तेवर आहेत. समान नागरी कायद्यास विरोध केला म्हणून त्यांची संभावना अत्यंत हीन शब्दांत केली जाते आणि अल्पसंख्याकांच्या लांगूलचालनाचा आरोप त्यांच्यावर सर्रास केला जातो.

# हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा इतिहास वर्तमानातही महत्वाचा का?

राजकीय इच्छाशक्तीशिवाय हैदराबाद मुक्तिसंग्राम यशस्वी होऊ शकला नसता, हे मान्य करावे लागेल. आजही काही प्रश्न असे आहेत, जे केवळ राजकीय इच्छाशक्ती अभावी भिजत पडले आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत-पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे तयार झाली, मात्र हैदराबाद हे स्वतंत्र राष्ट्र असल्याचा निजामाचा दावा होता.



हैदराबाद किंवा मराठवाडा मुक्तिसंग्राम हा स्वातंत्र्यासाठीचा राजकीय मुक्तीलढा जरी असला तरी तो खऱ्या अर्थाने सरंजामशाही विरुद्धचा लोकलढा होता. भारतातील बहुतांश संस्थाने सरंजामी प्रवृत्तीची होती. निजाम हा मध्ययुगीन सरंजामशाही प्रवृत्तीचा धर्मवेडा राजा होता. संस्थानातील लोकांच्या नागरी स्वातंत्र्यावरील बंधनांपेक्षा धार्मिक व सांस्कृतिक बंधनाने निजाम अत्यंत अप्रिय झाला होता. ब्रिटिशांनी भारतीयांच्या केवळ राजकीय स्वातंत्र्याला व राजकीय कृतींना प्रतिबंध केला होता. पण निजामाने लोकांचा धार्मिक व सांस्कृतिक स्वाभिमानच पायदळी तुडवला. लोकांचे जगणे मुश्किल केले. निजाम स्वत: त्याचे जहागीरदार व जमीनदार, मजलिस इत्तेहादूल मुस्लीमीन व रझाकार या घटकांनी सामान्य मुस्लिमेतर जनतेचे जीवन व संस्कृती धोक्यात आणली होती. निजामाचे संपूर्ण प्रशासनच मध्ययुगीन व सरंजामशाही वृत्तीचे होते. त्यामुळे निजामाने केलेला विकास किंवा सोयीसुविधा फक्त प्रशासन व स्वधर्मियांच्या सोयीसाठीच होत्या. इतर धर्मियांची मात्र घोर उपेक्षा झाली होती.

माझ्यावर दोन वर्षे वारंवार बलात्कार झाला आणि त्याने सगळं काही, अल्पवयीन मुलीने सांगितला ‘तो’ भयंकर राष्ट्रवादीत फूट पडली नसल्याचं निवडणूक आयोगाला सांगितलं होतं, पण, जयंत पाटलांची टीका

रावसाहेब दानवेंनी रात्री खिशातून काढलेल्या ‘त्या’ चिट्ठीने चर्चांना उधाण, मनोज जरांगे संतापले, म्हणाले मला विनाकारण ट्रोल केलं जातंय, अजित पवारांची नाराजी; म्हणाले, आम्हाला बदनाम असा हा निजाम व त्याच्या राज्यकारभाराविरुद्ध जनतेने उभारलेल्या लोकलढ्यास मुक्तिलढा म्हटले जाते. या लढ्याचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हे आपले कर्तव्य आहे. कारण इतिहासातून भविष्यासाठी प्रेरणा घेऊन अशा प्रवृत्तीस प्रतिबंध करण्यासाठी हे लढे स्मरणात ठेवणे आवश्यक असते. आपण मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची सांगता साजरी करत असताना हा केवळ सरकारी कार्यक्रम न होता प्रत्येकाने तो इतिहास स्मरणात ठेवला पाहिजे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारत-पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे तयार झाली, मात्र हैदराबाद हे स्वतंत्र राष्ट्र असल्याचा निजामाचा दावा होता. ‘तुमच्या राष्ट्राला शुभेच्छा’ अशी तार निजामाने पंडित नेहरुंना पाठविली होती. निजामाला दक्षिण भारतात मुस्लीम संस्कृतीचे दुसरे पाकिस्तान उभे करावयाचे होते.

हैदराबाद म्हणजे पाकिस्तानची भारतातील प्रयोगशाळा होती. निजाम स्वतऩ्ला संस्थानिक न समजता ब्रिटिशांचा मित्र समजत असे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला पण सार्वभौम झाला नव्हता. निजाम हैदराबादला संस्थान न मानता निजाम इस्टेट मानत होता. असे हे हैदराबाद संस्थान तेलंगणा, मराठवाडा व कर्नाटक येथील त्रिभषिकांनी तयार झाले होते. यात आजच्या तेलंगणाचे आठ, मराठवाड्याचे पाच व कर्नाटकचे तीन जिल्हे होते आणि ते मेदक, गुलबर्गा वरंगल व औरंगाबाद सुभ्यात विभागले होते. बहुतांश लोकसंख्या हिंदू होती तर प्रशासक मात्र मुस्लीम होते. संपूर्ण संस्थान सरंजाम, जहागीरदार, जमीनदार व सर्फेखास यामध्ये विभागले गेले. साधारपण ४२ टक्के प्रदेश जहागिरीखाली येत होता.

जनतेसाठी कोणत्याही सुविधा नव्हत्याच. सरंजामी प्रशासन व धार्मिक कट्टरतावाद यामुळे या संस्थानाचा उल्लेख भारत सरकरने आपल्या श्वेतपत्रिकेत ‘सरंजामी राज्य’ असा केला होता. हैदराबाद संस्थानातील तीन्ही प्रदेशांचे भौगोलिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक संदर्भ वेगवेगळे होते. तेलंगणा प्रदेश हा जमीनदारी व जहागीरदारीत विभागलेला होता. जमीनदारी पद्धतीमुळे जनतेचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते.

म्हणून तेलंगणात नक्षलवादी आंदोलनाची वाढ झाली. कन्नड व मराठवाडा प्रदेशात रयतवारी आणि निजामाची सर्फेखास पद्धत असल्यामुळे पाटील, देशमुख, सावकार इत्यादींनी सामान्य जनतेचे शोषण केले. यासोबतच मराठवाड्यात मजलीस इत्तेहादुल मुस्लीमीन संघटनेने रझाकार या अर्धसैनिक दलाद्वारे धार्मिक उच्छाद मांडल्यामुळे मराठवाडा व कन्नड प्रदेशातील जनता सातव्या निजामाच्या काळात त्रस्त झाली होती.

# नवीन संचालक मंडळ आल्यानंतर एसटी बँक संभ्रमात?

चार हजार कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल असलेली ही पगारदार नोकरांची देशातील अग्रणी बँक वाचली पाहिजे.



देशातील पगारदार नोकरांची अग्रगण्य समजली जाणारी, ७२ हजार सभासद, व राज्यभरात ५० शाखा तसेच ११ विस्तार केंद्रे असलेली स्टेट ट्रान्सपोर्ट को - ऑप बँक या एसटी कर्मचाऱ्यांच्या बँकेत नुकते सत्तांतर होऊन नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले आहे. या संचालक मंडळाने बँकेची नीट माहिती समजून न घेता पहिल्याच बैठकीत काही निर्णय घेतले. यावर समाजमाध्यमे, वृत्तपत्रात उलटसुलट चर्चा सरु झाली आणि सभासद, ठेवीदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. याचा परिणाम म्हणून ठेवीदारांनी २२५ कोटी रुपयांच्या ठेवी काढल्या असल्याचे समजते. ठेवी काढणाऱ्यांची संख्याही वाढते आहे. सभासद, ठेवीदारांमध्ये संभ्रमावस्था असताना बँक प्रशासनाने कोणतेही खुलासा न करणे हे आश्चर्यकारक आहे. हा संभ्रम वेळेत दूर न झाल्यास बँकेसाठी ही धोक्याची घंटा आहे. एसटी बँकेत एकूण २३०० कोटी रुपयांच्या ठेवी असून त्यातील आतापर्यंत २२५ कोटी रुपयांच्या ठेवी काढण्यात आलेल्या आहेत. ठेवी काढणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे दैनंदिन व्यवहार करण्यात अडचणी येतात. बँकेने व्यवसायाचा भाग म्हणून विविध वित्तीय संस्थेत केलेली गुंतवणूक दैनंदिन व्यवहारासाठी व क्लिअरिंगसाठी तोडावी लागली असल्याचे भयाण वास्तव समोर आले आहे. आतापर्यंत अंदाजे १०० कोटी रुपयांची गुंतवणूक तोडली असल्याचे समजते. कुठल्याही बँकेचा गुंतवणूक हाच मुख्य गाभा असतो. त्यातूनच बँकिंग व्यवसाय चालतो, पण एसटी बँकेच्या दैदिप्यमान ७० वर्षांच्या कारकिर्दीत पहिल्यांदा या व्यावसायिक धोरणालाच तडा गेला आहे. त्यामुळे आता भविष्यात बँक अडचणीत सापडते की काय, असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे. माझ्यावर दोन वर्षे वारंवार बलात्कार झाला आणि त्याने सगळं काही, अल्पवयीन मुलीने सांगितला ‘तो’ भयंकर अनुभव राष्ट्रवादीत फूट पडली नसल्याचं निवडणूक आयोगाला सांगितलं होतं, पण, जयंत पाटलांची टीका रावसाहेब दानवेंनी रात्री खिशातून काढलेल्या ‘त्या’ चिट्ठीने चर्चांना उधाण, मनोज जरांगे संतापले, म्हणाले मला विनाकारण ट्रोल केलं जातंय, अजित पवारांची नाराजी; म्हणाले, आम्हाला बदनाम सत्तापरिवर्तन हे लोकशाही पद्धतीने झाले असल्याने त्याला हरकत असण्याचे कारण नाही. आता नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले आहे. पण संचालक मंडळाच्या पहिल्याच बैठकीत काही निर्णय घेतले. याबाबत माध्यमात उलटसुलट चर्चा झाली. त्याने सभासद, ठेवीदारांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम म्हणून साधारण २२५ कोटी रुपयांच्या ठेवी ठेवीदारांनी काढल्या असल्याचे समजते. खरे तर अशी उलटसुलट चर्चा सुरू झाल्यावर अशा चर्चेवर बँकेकडून खुलासा करणे आवश्यक होते. मात्र त्याऐवजी नव्या संचालक मंडळाच्या पॅनल प्रमुखांनी बँकेत अवैद्य मार्गाने जमवलेली रक्कम ठेवी म्हणून ठेवली असल्याची शंका घेत त्याची चौकशी करणार असल्याचे वादग्रस्त विधान केले. ठेवी काढणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. गेल्या दोन दशकांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बदनामी करण्याचे सुनियोजित प्रयत्न काही स्वयंघोषित विचारवंतांकडून होत आहेत. भारत तसेच विदेशातील काही माध्यमेही पंतप्रधान मोदी यांच्याबाबत पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन बाळगून असल्याचे दिसून येते. गेल्या दोन दशकांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बदनामी करण्याचे सुनियोजित प्रयत्न काही स्वयंघोषित विचारवंतांकडून होत आहेत. भारत तसेच विदेशातील काही माध्यमेही पंतप्रधान मोदी यांच्याबाबत पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन बाळगून असल्याचे दिसून येते. कोणतेही तारतम्य न ठेवता केलेल्या वैयक्तिक हल्ल्यांबरोबरच धोरणात्मक बाबींवरील टीकेचा सामना त्यांनी केला आहे. पण, आपल्या कार्यशैलीनुसार कायम कठोर मेहनत करून पंतप्रधान मोदी यांनी हे सर्व आरोप फोल ठरविले आहेत. जुन्या जमान्यातील लोकांपैकी काहीजण पंतप्रधान मोदी यांच्याबद्दल असलेल्या अढीतून प्रत्यक्षात भारताच्या भवितव्याबाबतच्या धोरणांचाच द्वेष करू लागले आहेत, ही मोठी शोकांतिका आहे. महाराष्ट्राची हास्यजत्रामध्ये फटकारलं, टोमणे खावे लागले विशाखा सुभेदार यांनी सांगितलं कार्यक्रम सोडण्याचं खरं कारण, म्हणाल्या, स्किट झाल्यानंतर राऊत आले नाहीत का? मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत केलेल्या विधानावर संजय राऊत म्हणाले माझ्यावर दोन वर्षे वारंवार बलात्कार झाला आणि त्याने सगळं काही, अल्पवयीन मुलीने सांगितला ‘तो’ भयंकर अनुभव अंगावर घोंगडे टाकून बरं करण्याचा दावा, कंबलवाले बाबावर टीकेनंतर राम कदमांची पहिली प्रतिक्रिया, म्हणाले इंडिया या शब्दाऐवजी भारत हा योग्य शब्द वापरल्यानंतरही हे लोक मोदींवर देशाचे नाव बदलल्याचा आरोप करतात. भारत या नावाला राज्यघटनेतच मान्यता असल्याने या टीकाकारांचे हसे होत आहे. असे असले तरी पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्याविरोधात करण्यात आलेला प्रत्येक खोटा आरोप, अपप्रचाराला चोख प्रत्युत्तर दिले आहे. गेल्या दोन दशकांत अशा अनेक खोटय़ा कहाण्या पसरविण्यात आल्या आणि त्यांचा निर्णायक अंतही झाला. या लेखाच्या निमित्ताने आपण फक्त अशी पाच कथने किंवा दावे तपासून पाहू, जे पंतप्रधान मोदी यांनी खोटे ठरविले. पहिले कथन म्हणजे, पंतप्रधान मोदी हे आजच्या गुंतागुंतीच्या जागतिक स्थितीत जी २० नेत्यांच्या शिखर परिषदेची आव्हाने पेलण्यास पुरेसे सक्षम नाहीत. जी २० परिषद अयशस्वी ठरेल अशा विचाराने जुन्या काळातील भाष्यकारांना आधीच पछाडले होते. जणू काही भारत सरकार या जागतिक व्यासपीठावर अयशस्वी ठरावे म्हणून त्यांनी देव पाण्यात घातले होते. त्यांना वाटत होते की, सध्याच्या ध्रुवीकरण झालेल्या जगात पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारत कोणतीही सकारात्मक कामगिरी बजावू शकणार नाही. क्षी जिनिपग आणि व्लादिमीर पुतिन यांच्या अनुपस्थितीमुळे त्यांच्या या दाव्याला बळ येत होते. भारताची जी २० अध्यक्षपदाची कारकिर्द यशस्वी ठरणार नाही, असे गुप्त मनसुबे आखत ते भारताच्या यशाबाबत अगदी अलीकडील काही दिवसांपर्यंत कुशंका व्यक्त करीत होते. तेच त्यांचे काम होते. एकीकडे द गार्डियनकडून जागतिकीकरणाच्या अंताची निराशावादी भूमिका मांडली जात असताना दुसरीकडे वॉशिंग्टन पोस्टकडून जी २० साठी वारे प्रतिकूल असल्याचे सांगितले जात होते.

वरुड दर्पण हे दैनिक पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून दैनिक वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# रोहयोची देयके अदा करण्यासाठी उपाययोजना कराव्यात : जिल्हाधिकारी आशिष येरेकर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



*अमरावती* – महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतून कुशल आणि अकुशल अंतर्गत विविध कामे घेण्यात येतात. यात अकुशलचा निधीचा प्राप्त राहत असल्याने यातून मजूरांची देयके अदा करावीत, देयके अदा करण्यासाठी पोस्ट पेमेंट बँकेचे खाते उघडण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात मनरेगा अंतर्गत सर्व यंत्रणांची कामकाजविषयक आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, उपवन संरक्षक सुमितकुमार, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांच्यासह तहसिलदार आणि गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, मनरेगामध्ये मस्टर देण्याचे अधिकार रोजगार सेवकांकडे देऊ नये. तहसिलदार यांनी त्यांच्या आखत्यारीत हे अधिकार ठेवावेत.

येत्या १ ऑगस्टपासून एक पेड माँ के नाम उपक्रम सुरु करण्यात येत आहे. त्यामुळे वृक्षलागवडीची कामे हाती घेण्यात यावी. तसेच मस्टर दिल्यानंतर रोजगार सेवकांकडून सात दिवसांच्या आत मस्टर जमा करुन घ्यावे.

मस्टर जमा होत नसल्यास देयके वेळेत होऊ शकली नसल्याने जिल्ह्याची कामगिरी खालावत आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थिती मध्ये मस्टर जमा करुन पहिली आणि दुसऱ्या स्वाक्षरीसाठी पाठविण्यात यावे. मनरेगाअंतर्गत घेण्यात आलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा. मजूरांचे देयक जमा करण्यासाठी आधार सिडींग महत्वाची बाब आहे. आधार सिडींग आणि बँक खात्याला आधार जोडण्याची प्रक्रिया तातडीने करण्यात यावी. मजूरांचे खाते उघडण्यासाठी पोस्ट पेमेंट बँकेचे अधिकारी सकारात्मक आहेत. स्थानिक स्तरावर त्यांच्याशी संपर्क साधून खाते नसलेल्या मजूरांचे खाते उघडण्यात यावे. या खात्यामुळे मजूरांना अपघात विम्याचे संरक्षण मिळणार आहे. मनरेगामध्ये अकुशलचा निधी प्राप्त होतो. यात कुशलचा निधी प्राप्त झाल्याबरोबर कामे पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

# मला मोहन भागवतांना पकडण्यास सांगितल होतं, भगवा आतंकवाद हे सगळं खोटं

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*मुंबई* – २९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगावमधील भिक्खू चौकात झालेल्या भीषण बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल आज (३१ जुलै) मुंबईतील एनआयएच्या विशेष न्यायालयात जाहीर करण्यात आला. तब्बल १७ वर्षांनंतर या प्रकरणात न्यायालयाने सर्व सातही आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. दरम्यान, मालेगाव स्फोटानंतर महिबूब मुजावर हे तत्कालीन पोलीस निरीक्षक होते.

मात्र त्यानंतर वेगळ्या गुन्ह्यात त्यांचे नावं आल्यानंतर त्यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आलेलं होतं. दरम्यान, या निकालानंतर महिबूब मुजावर हे प्रथमच माध्यमांसमोर आले आहेत. मालेगाव प्रकरणाचा निकाल आल्यानंतर निवृत्त पोलीस निरीक्षक महिबूब मुजावर पहिल्यांदाच माध्यमासमोर आले आहेत.

## मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण

# कुणीच दोषी नसेल तर ६ जणांना कुणी मारलं? : प्रकाश आंबेडकर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



*मालेगाव* – २००८ मध्ये घडलेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील तपासावर गंभीर प्रश्न उपस्थित करत वंचित बहुजन आघाडीचे नेते डॉ.प्रकाश आंबेडकर यांनी एनआयए आणि इतर तपास यंत्रणांच्या भूमिकेवर जोरदार टीका केली आहे.

जर या प्रकरणात कोणताही दोषी नसेल, तर सहा नागरिकांचा बळी नेमका कोणी घेतला? असा थेट सवाल त्यांनी केला आहे. 'एक्स' या समाज माध्यमावर पोस्ट करत त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. एनआयएने तपासात आपली भूमिका का बदलली? जोपर्यंत या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही, तोपर्यंत सत्य कधीच बाहेर येणार नाही! दिवंगत आयपीएस हेमंत करकरे यांच्या नेतृत्वाखालील दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) सुरु केलेल्या तपासाचे कागदपत्रे कूठे आहेत अस्तित्वात असलेल्या सिद्धांताचा वापर केला जात असताना त्यांनी नवीन तपास का सुरु केला हे एनआयए स्पष्ट करु शकेल का? असा सवाल प्रकाश आंबेडक यांनी उपस्थित केला आहे. आरोपींमधील अनेक बैठकींबद्दल माहिती असलेल्या काही सेवारत लष्करी अधिकाऱ्यांसह बहुतेक साक्षीदार अखेर न्यायालयात का उलटले? ते म्हणाले की, जर एटीएसकडे बनावट पुरावे असतील, तर एनआयए न्यायालयाने दोषपूर्ण तपासासाठी अधिकाऱ्यांना जबाबदार का ठरवले नाही आणि विभागीय चौकशीचे आदेश का दिले नाहीत?

# सावली डान्सबारवरुन अडचणीत आलेल्या कदम कुटुंबियांचा बचावात्मक पवित्रा, 'तो' परवाना केला परत?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



*मुंबई* – विधान परिषदेमध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी कांदिवलीमध्ये सावली बार असून तो ज्योती रामदास कदम यांच्या नावे आहे.

त्या गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या मातोश्री असल्याचा खळबळजनक आरोप केला होता. यानंतर विरोधकांकडून गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. आता विरोधकांकडून राजीनाम्यासाठी जोर वाढत असतानाच कदम कुटुंबीयांनी बचावात्मक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळत आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावे असलेला सावली बारमधील ऑर्केस्ट्राचा परवाना कदम कुटुंबियांनी परत केल्याची माहिती समोर येत आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या अडचणीत वाढ झालेली असताना ऑर्केस्ट्रा परवाना परत करुन फक्त रेस्टोबार आणि हॉटेल परवाना कदम कुटुंबीयांनी ठेवला असल्याची माहिती मिळाली आहे. सावली बारमधील ऑर्केस्ट्राचा परवाना केला परत कदम यांनी सावली बार ज्या व्यक्तीस चालवण्यास दिला, त्यासोबतचा करारनामा अगोदरच रद्द केला आहे.

## महसूल दिनी एक लाख वृक्षारोपण होणार

# महसूल सप्ताहाचे आयोजन : विविध कार्यक्रमांची रेलचेल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*अमरावती* – महसूल दिनाच्या निमित्ताने १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात वृक्षारोपण, दाखले वाटप आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महसूल दिनी एक लाख वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

महसूल दिनानिमित्त जिल्ह्यात वृक्ष लागवडीचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. यात एक लाखाहून अधिक वृक्ष लागवड करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याला वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. यासाठी सामाजिक वनीकरण विभागाशी समन्वय साधून रोपांची उपलब्धता करुन घेण्यात येणार आहे. यासोबतच स्वामित्व योजनेअंतर्गत पट्टेवाटपाचेही कार्यक्रम घेण्यात येणार आहे. तसेच नोंदणी विभागाकडून जुने दस्तावेज नागरिकांना वितरित करण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अभियानांतर्गत पानंद रस्ते मोकळे करुन या रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.

तसेच महसूल तंटामुक्त गाव अभियान राबविण्यात येणार आहे. धारणी तालुक्यात सुमारे अडीच हजार जात प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. तसेच थेट लाभाच्या योजना, आधार अपडेट, रेती पास वाटप आदी उपक्रमही राबविण्यात येणार आहे. महसूल सप्ताहात १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करण्यात येणार आहे. तसेच महसूल सप्ताहाचा शुभारंभ होईल. या दिवशी महसूल संवर्गातील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

यात उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी यांना पुरस्कार वितरण आणि मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. २ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमित जागेचे पट्टे वाटप कार्यक्रम करण्यात घेण्यात येणार आहे.

३ ऑगस्ट रोजी पाणंद व शिवारांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावण्यात येतील. ४ ऑगस्ट रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' प्रत्येक मंडळनिहाय राबविण्यात येईल.

५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील ज्या लाभार्थ्यांना डीबीटी झालेली नाही, त्यांना घरभेटी देऊन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करण्यात येईल. ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करुन ती अतिक्रमणमुक्त करण्याचे धोरण ठरविण्यात येईल. तसेच शर्तभंग झालेली जमीन शासनाकडे जमा करण्याचा निर्णय घेतला जाईल. ७ ऑगस्ट रोजी एम सँड धोरणाची अंमलबजावणी आणि नवीन मानक कार्यप्रणालीनुसार धोरण पूर्णत्वास नेण्यात येईल. याच दिवशी महसूल सप्ताहाचा सांगता समारंभ होणार आहे.

# माणिकराव कोकाटेंची क्रीडा खात्यावर उचलबांगडी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



*वरुड* – विधान भवनातील रम्मीचा डाव अखेर माणिकराव कोकाटे यांना चांगलाच महागात पडला आहे. माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषिखाते काढून घेण्यात आले आहे. त्यांच्या जागी राष्ट्रवादीचे नेते दत्तात्रय भरणे हे कृषिमंत्री म्हणून कारभार पाहणार आहेत तर भरणे यांच्याकडे असलेले क्रीडा आणि युवक कल्याण खाते माणिकराव कोकाटे यांना देण्यात आले आहे.

नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे मोबाईलवर ऑनलाईन रम्मीचा डाव खेळताना दिसले होते. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी हा व्हिडिओ व्हायरल केला होता. एकीकडे शेतकरी आत्महत्या वाढत असताना माणिकराव कोकाटेंच्या रम्मीच्या डावामुळे विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत त्यांच्यावर टीकेची झोड उठवली होती. माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा, अशीही मागणी होत होती. विरोधकांच्या आक्रमकपणामुळे आणि राज्यभरातील शेतकऱ्यांचा तीव्र संताप पाहता अखेर आता माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषिखाते काढून घेण्यात आले आहे.

राज्याचे नवे कृषिमंत्री म्हणून दत्तात्रय भरणे हे कारभार पाहतील तर माणिकराव कोकाटे यांच्याकडे आता क्रीडा आणि युवक कल्याण मंत्रालयाची जबाबदारी असेल.

# बसमध्ये तरुणावर कोयत्याने हल्ला, आरोपीने स्वत:वरही केले वार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*बारामती* – बारामती इंदापूर एसटी मध्ये एकावर कोयत्याने वार झाल्याची धक्कादायक घटना घडलेली आहे.

चालू एसटीत एकानं कोयत्याने वार करत एका तरुणाला गंभीररित्या जखमी केल्याची माहिती मिळत असून हल्लेखोर तरुणाने देखील स्वत:वरती वार करुन घेण्याचा प्रयत्न केला यावेळी प्रवाशांनी त्याला पकडून पोलिसांच्या हवाली केल आहे. बारामती तालुक्यातील काटेवाडी या ठिकाणी एसटी आली असता हा सगळा प्रकार घडलेला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इंदापूर आगाराची ही बस असून ती बारामती वरुन इंदापूरला निघाली होती. या बस मध्ये एकूण ६० प्रवासी होते. हल्ला झालेला तरुण आणि हल्लेखोर हे बसमध्ये पाठीमागील बाजूस बसले होते. एकाने अचानकच कोयता काढून दुसऱ्या तरुणावर वार करायला सुरुवात केली अशी माहिती बस वाहकाने दिली आहे.

## पोलिसांच्या अंगावर कार चढविण्याचा प्रयत्न

# माजी आमदारपुत्रासह ४०० जणांवर गुन्हा दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




*अमरावती* – कर्तव्यावरील पोलिसांच्या अंगावर कार घालण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी माजी आमदारपुत्र आणि धारणी बाजार समितीचे सभापती रोहित राजकुमार पटेल याच्याविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

चिखलदरा पोलिसांनी माजी आमदार राजकुमार पटेल यांच्यासह त्यांच्या ३०० ते ४०० सहकाऱ्यांविरुद्ध बेकायदेशीररीत्या रास्ता रोको, सार्वजनिक वाहतूक अडवणे व मृतदेहाची अवहेलना केल्याप्रकरणी गंभीर गुन्हे दाखल केलेत. अमरावतीच्या चिखलदरा तालुक्यातील नागापूरस्थित वसंतराव नाईक आदिवासी आश्रमशाळा येथे दोन दिवसांपूर्वी पाण्याच्या टाकीची भिंत अंगावर पडल्यामुळे त्या शाळेतील १४ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला, तर ३० जुलै रोजी त्या मुलीच्या मृतदेहाचे पोस्टमार्टम करण्यात आले. त्यानंतर पार्थिव मुलीच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. प्रेत अंत्यसंस्कारासाठी मुलीच्या मूळ गावी गांगरखेडा येथे न नेता ते धारणी प्रकल्प अधिकारी कार्यालयात नेऊन मृत मुलीच्या परिवारास जोपर्यंत ५० लाख रुपयांची आर्थिक मदत मिळत नाही, तोपर्यंत तिचे प्रेत प्रकल्प अधिकारी कार्यालयातच ठेवून आंदोलन करणार, अशी भूमिका माजी आमदार राजकूमार पटेल व त्यांचा मुलगा रोहित यांनी घेतली. दरम्यान राजकुमार पटेल, रोहित पटेल व इतरांनी घटांग टी-पॉइंट येथे विनापरवानगी सार्वजनिक रस्ता अडवून मुलीचे प्रेत रस्त्यावर ठेवले. यावेळी त्यांनी प्रकल्प अधिकारी कार्यालयात जाऊ द्या; अन्यथा आम्ही प्रेत घेऊन इथेच बसतो, असे म्हणत पोलिसांशी हुज्जत घालत रास्तारोको केला.

# मोवाड येथे महापूरातील २०४ मृतात्म्यांना श्रध्दांजली व वृक्षारोपन

## दोन पोलीस कर्मचाऱ्यांना आदरांजली

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

*नरखेड* - सन ३० जुलै १९९१ ला येथील वर्धा नदीलाआलेल्या महापुराने २०४ निष्पाप नागरीकांना जलसमाधी मिळाली होती. त्या महापूरात लोकांचे जीव वाचवीता वाचवीता मोवाड पोलीस चौकीचे दोन कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचाऱ्यांनीही आपल्या प्राणाची आहुती दीली.

आज त्याघडीला ३४ वर्ष पुर्ण होत आहे. त्या निमित्ताने मोवाड पोलीस चौकी येथे स्मृतींना उजाळा म्हणुन मृतात्म्यांना दोन मिनीट मौन श्रध्दांजली तसेच उपस्थीत पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपन कार्यक्रम पार पडला.



यावेळी कार्यक्रमाला नरखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक अजीत कदम हे होते तर प्रमुख उपस्थीती म्हणुन नरखेड येथील पतंजली योगपीठ हरीद्वारचे आजीवन सदस्य पुरुषोत्तम थोटे, वृक्षमित्र महादेवराव अरखेल, योगशिक्षक श्रीकांत मालधुरे, मोवाड पोलीस चौकीचे पोलीस जमादार साहेबराव मसराम, पोलीस शिपाई दीनेश हिवसे, शिपाई शुभम दीक्षीत, चंद्रशेखर म्हस्के, पत्रकार शेखर पाटील, मोवाड प्रा.आ.केंद्राचे वैद्यकीय अधीकारी डॉ.प्रज्वल दानळे, डॉ.मयुर बोपचे, डॉ.संजय सोळंकी, आरोग्य सहाय्यक रेवतकर, घोडकी, परीचारीका वैभवी शेंदरे, केशवराव सातपूते, यश घोडसाडे, सुनील केवटे तसेच केशव कुंभारे यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थीती होती. दरम्यान महापूरातील दोन पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रतीकाकृती पुतळ्यांची फुले वाहुन हारार्पण करुन दोन मिनीट मौन श्रध्दांजली वाहण्यात आली.

# अन्नधान्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी केंद्र सरकारचे ठोस पावले

## नवीन प्रणालीमुळे अचूकता आणि विश्वासार्हतेत वाढ

## राज्यसभेत केंद्रीय राज्यमंत्री यांचे खासदार डॉ.बोंडे यांच्या प्रश्नाला उत्तर

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** - देशातील जनतेला उच्च प्रतीचे अन्नधान्य उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाने अन्नधान्याच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी एक अभिनव 'गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली' विकसित केली आहे.



राज्यसभेत अनुत्तरित प्रश्न क्रमांक ९९९ अंतर्गत खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती निमूबेन जयंतिभाई बंभनिया यांनी सांगितले की, केंद्रासाठी खरेदी केली जाणारी अन्नधान्ये विभागाने निश्चित केलेल्या एकसंध तपशिलांनुसारच खरेदी केली जातात.

ही गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली प्रयोगशाळेतील कामकाजाचे रिअल टाईम मॉनिटरिंग करते. त्यामुळे अन्नधान्याच्या खरेदीपासून ते वितरणापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता नियंत्रण अधिक कार्यक्षम व अचूक होत आहे.

या पद्धतीमुळे अन्नधान्य साठवणूक, परीक्षण आणि वितरण प्रक्रियेत पारदर्शकता, अचूकता व जनतेचा विश्वास वाढणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या अन्नधान्याला योग्य दर मिळण्याची आणि सामान्य जनतेला दर्जेदार अन्नधान्य उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८०४/२०२५** **ने.ता.०२/०९/२०२५**

**अर्जदार :-** १) गिता वासुदेवराव कराळे, वय अं.५८ वर्ष, धंदा-घरकाम, २) देवेंद्र वासुदेवराव कराळे, वय अं.३५ वर्ष, धंदा-शेती, ३) मेघा प्रविण भोयर, वय अं.२७ वर्ष, धंदा-घरकाम, अर्जदार क्र.१ व २ रा.पुसला, ता.वघाळ, ता.वरुड, अर्जदार.क्र.३ रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **वासुदेवराव गणपतराव कराळे, रा.वघाळ, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/०९/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख /०८/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७४४/२०२५** **ने.ता.०२/०९/२०२५**

**अर्जदार :-** १) श्रीमती पार्वताबाई चंद्रभानजी कोल्हे, वय अं.८० वर्ष, धंदा-काही नाही, २) आनंद चंद्रभानजी कोल्हे, वय अं.६० वर्ष, धंदा-मजुरी, रा.नागपूर, ता.जि.नागपूर, ३) धनराज चंद्रभानजी कोल्हे, वय अं.५५ वर्ष, धंदा-मजुरी, रा.पुसला, ता.वरुड, ह.मु.बडनेरा, ४) सौ.चंद्रकला रामु कुंभारे, वय अं.५३ वर्ष, धंदा- घरकाम, रा.थापेवाडा, ता.कळमेश्वर, ५) सौ.सिंधु रामुजी हेडाऊ, वय अं.५२ वर्ष, धंदा-घरकाम, क्र.१ व ५ रा.आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा, ६) सौ.मंदा सुनिल लिखार, वय अं.५४ वर्ष, धंदा-घरकाम, रा.दापोरी, ता.मोर्शी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत चंद्रभागा गोविंदराव कोल्हे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/०९/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **३०/०७/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**


# अलमट्टीची उंची वाढवू नका, अन्यथा सांगली-कोल्हापूरमध्ये पूरस्थिती गंभीर : मुख्यमंत्र्यांचे केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांना पत्र

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)





*मुंबई* - कर्नाटकने जर अलमट्टी धरणाची उंची वाढवली तर सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात पूर परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या धरणाची उंची वाढवू नये अशी विनंती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय लशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांना केली. मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात एक पत्र लिहून ही विनंती केली. या धरणाच्या बॅक वॉटर आणि पूरस्थितीवर अभ्यास सुरु असून त्याचा अहवाल येईपर्यंत उंची वाढवण्याच्या निर्णय अविवेकी ठरेल असंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हायड्रोलॉजी, रुरकी यांच्याकडून अलमट्टी धरणाचे बॅक वॉटर आणि कोल्हापूर आणि सांगलीतील पूरस्थितीवर अभ्यास सुरु आहे. त्यामुळे या संस्थेच्या अहवालाची वाट पाहावी असं मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या पत्रात लिहिलं आहे.

कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाची उंची ५१९.६ मी. वरुन ५२४.२५६ मी. करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. या धरणाची उंची वाढवली तर सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात पुराची स्थिती गंभीर होऊ शकते. पिके, मालमत्ता, जीवन आणि उपजीविकेला धोका निर्माण होऊ शकतो. कर्नाटक सरकारने पुनर्विचार करावा आणि अलमट्टी उंची वाढविण्याचा निर्णय थांबवावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय मंत्र्यांना पत्र लिहिलं आहे.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७४७/२०२५** **ने.ता.०२/०९/२०२५**

**अर्जदार :-** १) श्रीमती रंजना राजेंद्र पानसे, वय अं.६६ वर्ष, धंदा-घरकाम, २) गौरव राजेंद्र पानसे, वय अं.४० वर्ष, धंदा-मजुरी, ३) रोहीत राजेंद्र पानसे, वय अं.३८ वर्ष, धंदा- मजुरी, सर्व रा.वरुड, ता.वरुड, ह.मु.बॅग्लोर, ता.जि.बॅग्लोर (कर्नाटक)

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत राजेंद्र देवरावजी पानसे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०२/०९/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/०७/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८१९/२०२५** **ने.ता.०२/०९/२०२५**

**अर्जदार :-** १) मंदाबाई देविदासजी दळवी, वय अं.७७ वर्ष, धंदा-निरंक, मु.पो.दावसा, ता.नरखेड, जि.नागपूर, २) सुनंदाबाई गजानन शेगोकार, वय अं.५९ वर्ष, धंदा- घरकाम, रा.वार्ड क्र.१६, शनिवार पेठ, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी अर्जदार यांना **मयत नारायणराव बाबुरावजी चिखलकर व मयत इंदिराबाई नारायण चिखलकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०२/०९/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/०७/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील जे.एस.ठाकरे मॅडम, सह दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५००/२०२५** **ने.ता.२१/०६/२०२५**

**अर्जदार :-** १) गणेश शामराव वाघाडे, वय अं.४२ वर्ष, रा.पुसला, ह.मु.पारडसिंगा, २) सौ.रेखा भास्करराव नेहारे, वय अं.४९ वर्ष, रा.टेंभुरखेडा, ३) सौ.बेबी जगन राऊत, वय अं.५० वर्ष, रा.फेटरी, ४) सौ.छबी राजेंद्र राऊत, वय अं.३८ वर्ष, रा.वंडली, ५) सौ.मंदा ओमप्रकाश कोहळे, वय अं.४७ वर्ष, रा.फेटरी, ६) श्रीमती शांता रमेश वाघाडे, वय अं.६० वर्ष, रा.पुसला, ७) सौ.रितीका दुर्गादास चवारे, वय अं.३० वर्ष, रा.पंधराखेडी, ८) रवि रमेश वाघाडे, वय अं.२८ वर्ष, ९) सुरज रमेश वाघाडे, वय अं.२५ वर्ष, १०) राहुल रमेश वाघाडे, वय अं.२२ वर्ष, ११) कु.नेहा रमेश वाघाडे, वय अं.२० वर्ष, १२) श्रीमती दुर्गा रमेश वाघाडे, वय अं.५० वर्ष, १३) आशिष रमेश वाघाडे, वय अं.२६ वर्ष, रा.पुसला, १४) सौ.अश्विनी विठ्ठल राऊत, वय अं.२४ वर्ष, रा.पंचाळा, ता.आष्टी, जि.वर्धा

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांना **मयत श्रीमती यशोदा शामराव वाघाडे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/०६/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०६/०५/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.एस.ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५२८/२०२५** **ने.ता.३०/०७/२०२५**

**अर्जदार :-** १) रकीम जबीन तमीज खान पठाण, वय अं.५३ वर्ष, धंदा-घरकाम, २) रेहान उल्ला खान तमीज उल्ला खान पठाण, वय अं.३३ वर्ष, धंदा- नोकरी, ३) मुबशीर अहमद तमीज खान पठाण, वय अं.२८ वर्ष, धंदा- शिक्षण, ४) शहाना तब्बसुम तमीज खान पठाण, वय अं.२८ वर्ष, धंदा- घरकाम, ५) राजा मुदतशीर तमीज खान पठाण, वय अं.२५ वर्ष, धंदा-शिक्षण, सर्व रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांना **मयत तमिजउल्ला खॉ रहिम खॉ पठाण, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/०७/२०२५** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१६/०६/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# स्व.श्री नागोरावजी मोवाडे विद्यालय, आग्रा येथे वर्ग प्रतिनिधी व स्कूल हेड बॉय, हेड गर्लची निवड



**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

***नरखेड*** – विद्यार्थ्यांना लोकशाहीची जाणीव व्हावी या उदेशाने सर्व विद्यार्थ्यातून शाळा हेड बॉय व हेड गर्लची निवडणूक घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी हेड बॉय व हेड गर्ल साठी निवडणूक निर्वाचन अधिकारी अनिल ताजने यांच्या कडे रुपये १० जमा करुण आवेदन पत्रे भरली. त्यांना चिन्ह वाटप करुन, प्रचारा करिता वेळ देण्यात आला. डमी मतपत्रिका सर्व मतदार म्हणजे विद्यार्थ्यांना समजून सांगण्यात आल्या. नंतर गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक घेण्यात आली. हेड बॉय व हेड गर्ल म्हणून संकेत चौधरी तसेच भाविका खोंडे निवडणूक निवडून आले.तसेच प्रत्येक वर्गातून वर्ग प्रतिनिधी ची निवड लोकशाही पद्धतीने करण्यात आली.

निवडणूक अधिकारी म्हणून अनिल ताजने, केशव पाचपुते, राजेंद्र रडके यांनी काम पाहिले. निवडून आलेल्या विद्यार्थ्यांना पुष्प गुच्छ देऊन संस्था अध्यक्ष नंदलाल मोवाडे, संस्था सचिव जगदीश जीवतोडे, मुख्याधापक सुरेश बोबडे व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# भंडाऱ्याच्या साकोलीतील मुख्य तलाव फुटला : ४०० हेक्टरवरील पिकांसह शहरात पाणीच पाणी

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

***भंडारा*** – भंडाऱ्याचा साकोली येथील जुना शहरात असलेला मुख्य तलाव पहाटेच्या सुमारास फुटल्याची घटना घडली आहे.

मुसळधार पावसामुळे तलाव तुडुंब भरला होता आणि तलाव फुटण्याची शक्यता साकुलीचे माजी नगरसेवक मनीष कापगते यांनी काही दिवसापूर्वीचं व्यक्त केली होती. मात्र, प्रशासनानं याकडं दुर्लक्ष केल्यानं आज पहाटे हा तलाव फुटला. तलावातून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असल्यानं परिसरामधील



शेतशिवारात सध्या जलमय स्थिती निर्माण झालेली आहे. तलाव फुटल्यानं साकोली ते चंद्रपूर हा महामार्ग बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तर तलावाची पाळ फुटल्यानं साकोली – लाखांदूर महामार्गावरुन ते पाणी प्रवाहित होत असल्यानं या परिसरात असलेले सुमारे ४०० हेक्टर शेतजमीन जलमय झालीय. तर शेतीतील पिकं पाण्याखाली आली असल्याने शेतीचं मोठं नुकसान झालं आहे.

# सर्पदंशाने दोन महिलांचा मृत्यू

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

***वरुड*** – शेंदूरजनाघाट येथील दोन महिलांचा बुधवार ३० जुलै रोजी सर्पदंश झाल्याने मृत्यू झाल्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे, तर दुसरीकडे वरुडातील राजुरा परिसरातील एका युवकाला सर्पदंश झाल्याने त्याला पुढील उपचारासाठी अमरावती रेफर करण्यात आले आहे.

सर्पदंशाच्या घटनेमुळे तालुक्यात सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. शेंदूरजनाघाट येथील बालापेठ परिसरातील धनगवळी मंदिर परिसरात वास्तव्य असलेल्या मंदा पुरुषोत्तम अकर्ते (५०) या महिलेला पहाटेच्या सुमारास



झोपेतच सर्पदंश झाल्याने तिला अस्वस्थ वाटू लागल्याने तिला प्रथम खासगी रुग्णालयात व नंतर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते. परिस्थिती चिंताजनक असल्याने तिला अमरावती रेफर करण्यात आले; परंतु अखेर उपचारादरम्यान तिचा दुर्देवी मृत्यू झाला आहे. शेंदूरजनाघाट येथील न. प. मराठी शाळा परिसरातील दीपाली बंडू ऊर्फ यशवंत होले (२६) हिला सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास राहत्या घरीच सर्पदंश झाल्याने तिला तत्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; परंतु उपचारादरम्यान तिचा दुर्देवी मृत्यू झाला, तसेच वरुड येथील राजुरा नाका परिसरातील अंकुश संतोष उईके याला दुपारी १.३० वाजताच्या सुमारास सर्पदंश झाल्याने त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने त्याला तत्काळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

परंतु त्याची परिस्थिती चिंताजनक असल्याने त्याला डॉक्टरांकडून तत्काळ अमरावती रेफर करण्यात आले आहे.

# राधे-राधे म्हटल्याने चिमुरडीला बेदम मारहाण, मुख्याध्यापिका ईला कोल्विनला अटक

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

***नवी दिल्ली*** – छत्तीसगडमधील दुर्ग जिल्ह्यातील एका शाळेमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. शाळेत आल्यानंतर एका मुलीने शिक्षकांना राधे-राधे म्हणत अभिवादन केलं.



याचा राग आल्याने साडेतीन वर्षाच्या मुलीला बेदम मारहाण करण्यात आली. या मुलीने राधे-राधे म्हटल्याने राग आल्याने या शाळेची मुख्याध्यापिका ईला कोल्विन हिने मुलीचे तोंड चिकटपट्टीने बंद केले आणि नंतर तिला मारहाण केली असा आरोप पालकांनी केला आहे. पोलिसांमध्ये पालकांनी तक्रार केल्यानंतर ईला कोल्विनला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी या घटनेबद्दल माहिती देताना म्हटले की, नंदिनी नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत येणाऱ्या बागडुमर परिसरातील मदर टेरेसा इंग्रजी शाळेत बुधवारी हा सगळा प्रकार घडला होता. मुलीचे वडील प्रवीण यादव यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली, या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी ईला कोल्विनला अटक केली. पोलीस तक्रारीत प्रवीण यांनी म्हटले होते की त्यांची मुलगी जेव्हा घरी आली तेव्हा तिने पालकांना शाळेत घडलेला सगळा प्रकार सांगितला.

# मंत्रिमंडळाची चर्चा धनंजय मुंडेंच्या स्तरावर होत नाही, धनूभाऊंच्या कमबॅकवर मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

***नागपूर*** – विधिमंडळ सभागृहात ऑनलाईन रमी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषीखातं काढून घेतले जाणार आहे. त्यानंतर कृषी खात्याची जबाबदारी कोणाकडे दिली जाईल? अशा चर्चा होत असतानाच पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस



पक्षाचे नेते माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी सह्याद्री अतिथीगृहावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. यावरुन धनंजय मुंडे यांनी पुन्हा एकदा कृषीखातं मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु केल्याचे बोलले जात आहे. या सर्व घडामोडींनर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात माध्यमांशी सविस्तरपणे भाष्य केलं आहे. त्याचबरोबर भेटीबाबतचा खुलासा देखील त्यांनी केला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, जी काही घटना घडली त्या घटनेनंतर एक मोठा रोष होता, त्या संदर्भात सन्माननीय अजितदादा पवार आणि आमचे दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आम्ही सगळ्यांनी चर्चा केली आणि चर्चेअंती हा निर्णय घेतलेला आहे, आणि म्हणून त्यांचं खातं हे बदललेलं आहे. आपण जनतेची सेवा करण्यासाठी इथे आलो आहोत आणि जनतेची सेवा करताना आपण काय बोलतो, काय करतो, कसे बोलतो, या सर्व गोष्टी दिसतात आणि त्यावर नियंत्रण ठेवले पाहिजे, असंही पुढे देवेंद्र फडणवीसांनी म्हटलं आहे.

# जीममध्ये व्यायाम करताना तरुणाचा मृत्यू

**(प्रतिनिधी वरुड दर्पण)**

***पुणे*** – पिंपरी-चिंचवड शहरातून एक अतिशय दु:खद आणि धक्कादायक घटना समोर आली आहे.

नियमित व्यायाम करुन स्वत:ला फिट ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका ३७ वर्षीय तरुणाचा जीममध्येच हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. मिलिंद कुलकर्णी असे या तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मिलिंद कुलकर्णी हे गेल्या सहा महिन्यांपासून चिंचवड गावात असलेल्या एका जीममध्ये जात होते. ते नियमितपणे नसले तरी अधूनमधून व्यायाम करत होते. आज सकाळी नेहमीप्रमाणे त्यांनी जीममध्ये व्यायाम केला. त्यानंतर ते एका ठिकाणी बसले आणि त्यांनी पाणी प्यायले. मात्र, काही सेकंदांतच त्यांना अचानक भोवळ आली आणि ते खाली कोसळले. या प्रकारानंतर जीममधील इतर लोकांनी त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले, परंतु तोपर्यंत खूप उशीर झाला होता. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.




वरुड दर्पण

प्रतिनिधी (पत्रकार) नेमणे आहे

संपुर्ण जिल्हयात अल्पावधीतच नावारुपास आलेल्या दैनिक वरुड दर्पण या वृत्तपत्राकरीता अमरावती जिल्हयात तालुकास्तरावर प्रतिनिधी (पत्रकार) नेमणे आहे. अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. इच्छुकांनी आपला अर्ज खालील व्हॉटस्ॲप क्रमांकावर पाठवावा.

* मोर्शी * अमरावती * धामणगांव रेल्वे * चांदुर बाजार
* परतवाडा * चांदुर रेल्वे * वलगाव * नांदगांव खंडेश्वर * धारणी
* अचलपुर * धारणी * दर्यापूर * भातकूली * तिवसा

७७४५०६७७१२

* संपर्कासाठी पत्ता *
दैनिक वरुड दर्पण कार्यालय
जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती ४४४९०६